पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.३०७८** **दि. २४ /०९ /२०१९**

## बिबवेवाडी पोलीस ठाणे पुणे शहर

## नवरात्र उस्तव साजरे करणारे मंडळाची बैठक घेतले बाबत

दिनांक २४/०९/२०१९ रोजी सांयकाळी १७.३० ते १८.१५ वा चे दरम्यान बिबवेवाडी पोलीस ठाणे येथे कम्युनिटीग पोलीसींग च्या अनुशंगाने नवरात्र उत्सवा निमित्त उत्सव साजरे करणा-या मंडळाची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळेस १) उत्सव साजरा करताना दोन स्पिकर बॉक्स पेक्षा जास्त स्पिकर लावण्यात येवू नये २) डी जे डॉल्बीचा वापर करण्यात येवू नये आवाजाची तिव्रता वाढल्यास ध्वनी प्रदुषण कायदयान्वये कारवाई करण्यात येईल तसेच मिरवणुकी दरम्यान पारंपारिक वाद्याचा उपयोग करावा ३) वाहतुकीस अडथळा होणार नाही याची दक्षता घ्यावी. ४) सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसवावेत मुर्तीच्या संरक्षणासाठी २४ तास स्वयंसेवक नेमावेत ५) मंडळांनी मंडपाचा आकार सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वा नुसार रस्त्याचा एक तृतीयअंश भाग उपयोगात आणुन बांधावा ६) देवीच्या मुर्तीचे अग्णी पासुन पावसा पासुन संरक्षण होईल याची दक्षता घ्यावी ७) विद्युत परवानगी घ्यावी ८) धर्मदाय आयुक्त यांच्याकडे मंडळाची नोंदणी करावी ९) मंडळा करीता वर्गणी गोळा करताना कोणत्याही नागरीकांस त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी १०) उस्तवाच्या काळात मंडपा खाली काही लोक पत्यांचा जुगार खेळतात व इतर गैरप्रकार करतात ते करुन नये तसे अढळयास सदर मंडळावर व लोकांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल ११) मिरवणुकी दरम्यान कोणत्याही ज्वालागृही पदार्था सहयाने आगीचा लोळ हवेत सोडण्यास सक्त मनाई आहे. तसेच जाती धर्मा विरुध्द घोषणाबाजी व निदर्शने /पत्रके वाटू नये व नवरात्र उत्सव शांततेत पार पाडावा पोलीस ठाणे हद्दीत कोणताही अनुचित प्रकार दिसुन आल्यास त्याबाबत आम्हास तात्काळ कळविणे बाबत अवाहन केले आहे.

सदर बैठकीस वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री कुमार घाडगे,पोलीस उप निरीक्षक श्री अतुल थोरात व पोलीस ठाणेकडील गोपनीयचे कर्मचारी यांच्यासह नवरात्र उत्सव साजरा करणा-या मंडळाचे अध्यक्ष व कार्यकर्ते असे एकुण ४५ ते ५० सदस्य हजर होते.


स्वागत कक्ष


शिक्षण विभाग प्राथमिक